| | | | |
|---|---|---|---|
| MHBI160010712024 | दाखल दिनांक | : | १९.०९.२०२४ |
| | नोंदणी दिनांक | : | १९.०९.२०२४ |
| | निकाल दिनांक | : | १०.०७.२०२६ |
| | कालावधी | | वर्षे महिने दिवस<br>०१ ०९ २१ |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शिरुर कासार, जि.बीड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : अक्षय सं. जगताप)**
(न्यायनिर्णय : दिनांक १० जुलै २०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र.७७/२०२४**
**निशाणी क्र.१७/ब.**

प्रथम खबर अहवाल तपशील
गुन्हा नोंद क्र. : १०७/२०२४
पोलीस ठाणे : शिरुर कासार, जि.बीड.

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत–पोलीस ठाणे शिरुर कासार,<br>जि.बीड. |
| सरकारी अभियोक्ता | श्री. डी. एम. पाटील |
| **आरोपी** | **१. समीर सत्तार शेख**<br>वय : २७ वर्षे,<br>रा. इंदिरा नगर, ता. शिरुर कासार, जि. बीड<br>**२. शेख सत्तार सरदार**<br>वय : ५० वर्षे,<br>रा. इंदिरा नगर, ता. शिरुर कासार, जि. बीड |
| आरोपीचे विधीज्ञ | श्री. ए. के. कांबळे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २०.०६.२०२४ |
| प्रथम खबर अहवाल | २१.०६.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १९.०९.२०२४ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | १२.०६.२०२५ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १२.०६.२०२५ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | १०.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १०.०७.२०२६ |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनवर मुक्त झाल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | शिक्षा | **Period of detention undergone during trial.** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **समीर सत्तार शेख** | नोटीसीवर सोडण्यात आले | -- | भादंवि चे ४५२, ३५४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये | दोषारोपातुन मुक्त केले | -- | -- |
| २ | **शेख सत्तार सरदार** | नोटीसीवर सोडण्यात आले | -- | भादंवि चे ४५२, ३५४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये | दोषारोपातुन मुक्त केले | -- | -- |

### अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | निशाणी क्र. | साक्षी प्रकार |
|---|---|---|---|
| १. | पिडीत फिर्यादी | १२ | फिर्यादी |
| २. | पिडीत फिर्यादीची सुन | १३ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

### आरोपी तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

### न्यायालया मार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

### अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**मान्य केलेली कागदपत्र**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | १६ | घटनास्थळ पंचनामा |

**आरोपी तर्फे देण्यात आलेल्या निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**न्यायालया तर्फे देण्यात आलेले निशाणी**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**मुद्देमालचा तपशील**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

:: **न्या य नि र्ण य** ::

(दिनांक १० जुलै २०२६ रोजी घोषीत)

आरोपी क्र.१ व २ विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४५२, ३५४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये खटला चालविण्यात आला.

२) प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी ही महिला असुन आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४५२, ३५४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले आहे. करिता, फिर्यादीचे नाव नमुद न करता यापुढे खबरीस 'पिडीत फिर्यादी' असे संबोधण्यात आले आहे.

**अभियोग पक्षाचे कथन**

३) दिनांक २१/०६/२०२४ रोजी पिडीत फिर्यादीने पोलीस स्टेशन, शिरुर कासार येथे तोंडी फिर्याद दिली की, दिनांक २०/०६/२०२४ रोजी सायंकाळी ०८.३० वाजण्याच्या सुमारास मौजे इंदिरा नगर, ता. शिरुर कासार, जि.बीड येथील पिडीत फिर्यादीच्या

घरी पिडीत फिर्यादी व तिची सुन स्वयंपाक करित असताना आरोपी क्र.१ व २ हे वाईट उद्देशाने फिर्यादीच्या घरात आले व पिडीत फिर्यादीच्या हाताला धरुन घराबाहेर ओढले व तिच्यासोबत तिस लाज वाटेल असे कृत्य केले. त्यानंतर आरोपी हे पिडीत फिर्यादीच्या अंगाला झोंबाझोंबी करित असताना तिने आरडा ओरडा केला. परंतु, कोणीही आले नाही. त्यानंतर आरोपींनी जाताना पिडीत फिर्यादी व तिच्या सुनेला शिवीगाळ केली व जर कोणाला याबद्दल सांगितले तर जिवे मारुन टाकतोल अशी धमकी दिली.

४) फिर्यादीच्या सदरच्या तोंडी तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, शिरुर कासार येथे आरोपीचे विरोधात प्रथम खबर अहवाल क्रमांक १०७/२०२४ भारतीय दंड विधानाचे कलम ४५२, ३५४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला.

५) सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार बी. आर. सुरवसे, ब.न. १२४५ यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी भेट देवुन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. आरोपींना नोटीस दिली. साक्षीदारांची तपास टिपणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली. तपासाअंती तपासी अंमलदाराने आरोपी क्र.१ व २ यांचे विरोधात दोषारोपपत्र दाखल केले.

## दोषारोप व आरोपीचे म्हणणे

६) दोषारोपपत्र व दस्तऐवजांचे अवलोकन करुन निशाणी ८ कडे आरोपी विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४५२, ३५४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वयेचा दोषारोप निश्चित केला. आरोपींना दोषारोप त्यांच्या भाषेत वाचुन व समजावुन सांगितला. आरोपींनी दोषारोप नाकारुन संपरिक्षा करण्याची विनंती केली.

७) आरोपी क्र.१ व २ विरूध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या अनुषंगाने पुरावा न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अंतर्गत बयाण नोंदविण्यात आले नाही. त्याबाबतचा आदेश निशाणी १ वर पारित करण्यात आला आहे.

## मुद्दे व निष्कर्ष

८) सरकारपक्षा तर्फे विद्वान विधिज्ञ डी. एम. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपी तर्फे विद्वान विधिज्ञ ए. के. कांबळे यांचा युक्तीवाद ऐकला. साक्षीपुरावे व संचीकेचे अवलोकन केले. आरोपी पक्षाचा युक्तीवाद व प्रकरणाचे स्वरुप पाहता खालील मुद्दे विचाराधीन येतात. सदर मुद्द्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक २०/०६/२०२४ रोजी सायंकाळी ०८.३० वाजताच्या दरम्यान मौजे इंदिरा नगर, ता. शिरुर कासार येथील फिर्यादीच्या घरी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीचे घरात बेकायदेशिररित्या फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या दृष्टीने प्रवेश करुन गृहअतिक्रमण केले ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | नाही. |
| २) | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन पिडीत फिर्यादीच्या हाताला धरुन तिला ओढले व तिचे अंगाला झोंबाझोंबी करुन तिचा विनयभंग केला व तिच्यावरती फौजदारी बलप्रयोग केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | नाही. |
| ३) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ केली व प्रक्षोभीत केले की ज्यामुळे ते शांततेचा भंग करु शकतात अथवा इतर कोणताही गुन्हा करु शकतात याची आरोपीस कल्पना होती ही बाब अभियोजनपक्षाने शाबित केली आहे काय? | नाही. |
| ४) | वर नमूद केलेली तारीख, वेळ व ठिकाणावर आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना फिर्यादीस धमकी देवून त्याच्यावर फौजदारीपात्र धाकदपटशा केल्याची बाब अभियोजन पक्षाने शाबित केली आहे काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ५) | अंतीम आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

**का र ण मि मां सा**

९) अभियोगपक्षाने आरोपी विरुध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरीता वर नमुद केल्याप्रमाणे एकुण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदवली आहे. अभियोगपक्षाला उर्वरीत साक्षीदारांची साक्ष तपासण्याची वारंवार संधी देण्यात आली. परंतु, अभियोगपक्ष सदरील साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेवु शकला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा निशाणी १ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला. उलटपक्षी, आरोपी तर्फे त्याचे बचावात कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा सादर करण्यात आलेला नाही. तर आरोपी तर्फे घटनास्थळ पंचनामा निशाणी १६ अन्वये मान्य करण्यात आले आहे.

**<u>मुद्दा क्र. १ ते ४ बाबत</u>** –

१०) अभियोगपक्षाने आरोपी क्र.१ व २ विरुध्द ठेवलेले भारतीय दंड संहिता कलम ४५२, ३५४, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वयेचे दोषारोप शाबीत करण्याकरीता आरोपींनी आपसात संगनमत करुन पिडीत फिर्यादीच्या घरात घुसुन पिडीत फिर्यादीच्या हाताला धरुन तिचे अंगाला झोंबाझोंबी करुन तिचा विनयभंग केला व तिच्यावरती फौजदारीपात्र बलप्रयोग केला व पिडीत फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी अभियोगपक्षाने शाबीत करणे गरजेचे आहे. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द ठेवलेले दोषारोप शाबीत केले किंवा नाही हे पाहणे करीता अभियोगपक्षा तर्फे आलेल्या तोंडी व लेखी पुराव्याचे सुक्ष्मपणे अवलोकन करणे गरजेचे आहे.

११) अभियोगपक्षा तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ ही पिडीत फिर्यादी असुन साक्षीदार क्र.२ ही पिडीत फिर्यादीची सुन आहे. साक्षीदार क्र.१ व २ यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले आहे की, आरोपी हे त्यांचे भावकतील असुन दिनांक

२०/०६/२०२४ रोजी रोजी आरोपी व त्यांचेत किरकोळ वाद झाले होते. त्यानंतर पिडीत फिर्यादीने आरोपी विरूध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. परंतु, त्यातील मजकुर पिडीत फिर्यादीस माहित नसल्याचे तिने कथन केले आहे. साक्षीदार क्र. १ व २ यांनी त्यांचे पुराव्यात पुढे आरोपी क्र.१ व २ विरूध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपास अनुसरुन कोणतेही कथन केले नाही.

१२) साक्षीदार क्र. १ व २ हे अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने त्यांना न्यायालयाचे परवानगीने उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु, अभियोगपक्षास सहाय्यक असे पटलावर काहीही आले नाही. पुढे साक्षीदार क्र. १ व २ यांनी आरोपी व त्यांचेत तडजोड झाल्याचे मान्य केले आहे.

१३) अभियोगपक्षा तर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र. १ व २ यांचे पुराव्या वरून त्यांचा तोंडी पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही. तसेच आरोपी क्र. १ व २ विरुध्दचा गुन्हा शाबीत करण्याकामी अभियोगपक्षा तर्फे वर नमूद साक्षीदारा व्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा अथवा इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे आरोपींनी आपसात संगनमत करुन पिडीत फिर्यादीच्या घरात घुसुन पिडीत फिर्यादीच्या हाताला धरुन तिचे अंगाला झोंबाझोंबी करुन तिचा विनयभंग केला व तिच्यावरती फौजदारीपात्र बलप्रयोग केला व पिडीत फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी सिध्द करण्यात अभियोगपक्षास पुर्णतः अपयश आले आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी उत्तरीत केले आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ बाबतः–</u>**

१४) मुद्दा क्र. १ ते ४ च्या निष्कर्षावरुन आरोपी क्र.१ व २ हे त्यांचे विरुध्द ठेवलेल्या दोषारोपातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र. ५ चे उत्तरा दाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ व २ यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ४५२, ३५४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये पात्र असलेल्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ ची पुर्तता करिता प्रत्येकी १५,०००/– चे वैयक्तीक व जामीनदाराचे बंधपत्र द्यावे.

३. आरोपींचे स्वबंधपत्र रद्द करण्यात येते.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ अन्वये प्रस्तुत न्यायानिवाड्याची एक सत्यप्रत पिडीत फिर्यादीस जिल्हादंडाधिकारी, बीड यांचे मार्फत पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.07.10 16:15:29 +0530

शिरूर कासार.
दिनांक १०/०७/२०२६

**(अक्षय सं. जगताप)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शिरूर कासार

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 10/07/2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 10/07/2026 |

SAGAR SOPANRAO AJABE

Digitally signed by SAGAR SOPANRAO AJABE
Date: 2026.07.10 16:16:09 +0530

**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-III